**सोलापूर महानगरपालिका ,सोलापूर**

**क्रीडा कार्यालय**

**इंदिरा गांधी स्टेडीयम, चार पुतळा पाठीमागे , सोलापूर**

**( मुख्य कार्यालय - इंद्रभूवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स,सोलापूर ४१३००१. )**

---

**ईंदिरा गांधी स्टेडीयम ( पार्क मैदान ) क्रिकेट स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करून देणे संबधीच्या शर्ती व अटी**

१) मैदानावर स्पर्धेवेळी येताना क्रिकेटचाच युनिफॉर्म (पांढराच) असावा.

२)क्रिकेट स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडूंना स्पाईक्स शूज वापरणे आवश्यक असणार आहे.

३)स्टेडीयम ड्रेसिंग रूम स्थानिक स्पर्धा/सामन्यास वापरास मिळणार नाही.

४)**टोर्नामेंट स्पर्धेसाठीमैदानबुककरावयाचेझाल्यासकमीतकमीपाचदिवसबुककरावेलागेल.**

५)**स्पर्धेच्यावेळी**प्रत्येकचारदिवसानंतरएकदिवसमैदानासपाणीदेण्यासाठी वनिगाठेवण्यासाठीसुट्टी राहील.

६)स्टेडीयमवर स्थानिक स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे आंतरजिल्हा ( **BCCI ,MCA**) सामने आल्यास चालू असलेलीस्थानिक स्पर्धा तात्पुरती बंद ठेवून प्राधान्याने MCA चे सामने झाल्यानंतर स्थगित/थांबलेले सामने परत चालू करता येतील.

७)सोलापूर सिद्धेश्वर मंदिराच्या बाजूने सर्व खेळपट्ट्यांना १ ते ११ नंबर असेल.

८)खेळपट्टी क्र.१ ते ४ व खेळपट्टी क्र.९ ते ११ नंबरच्या खेळपट्ट्या स्थानिक क्रिकेट सामन्यांसाठी असतील.

९)खेळपट्टी क्र.५ ते ८ या खेळपट्ट्या जिल्हा क्रिकेट सामन्यासाठी आणि रणजी सामने यासाठी राखीव असेल.

१०)सोलापूर जिल्ह्याचे व रणजी दोन दिवसीय व चार दिवसीय असल्यास साप्ताहिक सुट्टी पुढे घ्यावी.

११)सामना संपल्यानंतर **POP-OS** सिस्टिमचे पाणी द्यावे.

१२)रणजी सामनेच्या वेळी सराव खेळपट्ट्या व सरावाचे क्लब यांना सुट्टी राहील.

१३)क्रिकेटशिवाय इतर खेळासाठी मैदान वापरता येणार नाही.

१४)अर्जदाराने मैदान बुकिंग ऑनलाईन पद्धतीने करणे आवश्यक आहे. यासाठी भाडे ऑनलाईन पद्धतीने भरणे गरजेचे आहे . ऑनलाईन बुकिंग सामन्याच्या तारखेच्याएक वर्ष आधीपासून करता येईल.

१५)मागणीदारास त्याचे काही अडचणीमुळे त्याने बुकींग केलेली तारीख रद्द करण्याचा प्रसंग आला तर भाडे रकम ही खालीलप्रमाणे परत मिळू शकेल.

- सामने दिनांकाचे ३ महिने पूर्वी कळविल्यास ९०% भाडेरक्कम परत मिळेल.
- सामने दिनांकाचे २ महिने पूर्वी कळविल्यास ७५% भाडे रक्कम परत मिळेल.
- सामनेदिनांकाचे १महिने अगोदर कळविल्यास ५०% भाडे रक्कम परत मिळेल.
- सामनेदिनांकच्या 1 महिनेपेक्षा कमी कालावधीत बुकिंग रद्द केल्यास भाडेरक्कम परत मिळणारनाही.

१६)स्पर्धा आयोजकांनाबुकिंग झाल्यानंतर तारखांची आपसांत परस्पर अदलाबदल करता येणार नाही. तारखांची अदलाबदल करणेबाबतचा अर्ज मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त सो.म.पा. यांना राहील याचे कारण देणेत येणार नाही.

१७)एखाद्या अर्जदारास ठरलेल्या दिवशी ठरलेल्याक्रिकेट सामन्यासाठीकाही कारणामुळे अगरअडचणीमुळे मैदानाचा वापर करता आला नाही तर त्याने भरलेल्या भाड्याची रक्कम त्यासपरत केली जाणार नाही. मात्रशासकीय कारणामुळे दिलेली परवानगी रद्द करावी लागली तरत्यांना क्रिकेट सामन्यासाठी त्यानंतरची तारीख दिलीजाईल अगर त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यासत्यांना भरलेली भाडयाची रक्कम परत केली जाईल.

१८)मैदान ताब्यात दिल्यापासून ते सामना संपेपर्यंतच्या वेळेत त्याची खराबी अगर नुकसानी होणार नाही याची जबाबदारी अर्जदारावर राहील.जर मैदानाची व खेळपट्टीची खराबी अगर नुकसानी झाल्यास त्याबद्दल मा. आयुक्त सो.म.पा. अथवा त्यांचे वतीने क्रीडाधिकारी ठरवतील ती नुकसान भरपाई अर्जदारास भरून द्यावी लागेल.मैदानचीखराबी अगर नुकसानीझाल्यासयोग्य त्या कायदेशीर पद्धतीने नुकसानीच्या रकमेची वसुली करणेत येईल.

१९)खेळाडू व क्रिकेट सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांच्या कोणत्याही वस्तू हरवल्यास अथवा चोरीला गेल्यास त्याची जबाबदारी महापालिकेची असणार नाही.

२०)मैदानावर थुंकणे व धूम्रपान करणे, बेशिस्त किंवा आक्षेपार्ह वर्तन करणे अथवा या उप्परही अशी नुकसानीकेली तर त्याबद्दल भरपाई करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. याबाबत मा. आयुक्त सो.म.पा. अथवा त्यांचे वतीने क्रीडाधिकारी ठरवतील तो दंड लागू राहील.

२१)सो.म.पा.चे क्रीडाधिकारी हे मा. आयुक्त सो.म.पा. यांच्या नियंत्रणाखाली या क्रिकेट मैदानाचे व्यवस्था व दैनंदिन कारभार पाहतील.

२२)सदर नियम बदलणे अगर दुरुस्त करणे अगर जादा नियमांची भर घालणे यासाठी नोटीस न देता कारवाई करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो.म.पा. यांना आहे. ते मैदान वापरणा-या स्पर्धा आयोजक, सहभागी संघ व त्यांचे व्यवस्थापन यांचेवर बंधनकारक राहतील.

२३)सदर नियमांच्या अर्थाबदल अगर मैदानाच्या उपयोगाबद्दल कोणत्याही बाबतीत अर्जदार व क्रीडाधिकारी यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा. आयुक्त सो.म.पा. यांचे आदेश अंतिम राहील व तो दोघांवरही बंधनकारक राहिल.

२४) एकाच दिवसाकरिता दोन जणांचे ऑनलाईन बुकींग झाल्यास वेळेनुसार प्रथम बुकींग झालेल्याला प्राधान्य दिले जाईल.

२५)ऑनलाईन बुकींगचे पेमेंटची दुसरे दिवशी बँकेशी रुजवात घेऊन खात्री केलेनंतर बुकींग पक्केकरणेत येईल अन्यथा बुकींग रद्द केले जाईल.

२६) सदरचे नियम सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहतील.

२७) संयोजकाने सर्व अटी व शर्ती वाचूनच ऑनलाईन बुकिंग करावे.

२८) स्पर्धा सामने आयोजक, सहभागी संघ व त्यांचे स्पर्धा व्यवस्थापन यांना वरील सर्व अटी व शर्ती पालन करणे बंधनकारक आहे.

२९) **वेबसाईट वर उपलब्ध असलेले हमीपत्र डाऊनलोड करून** स्पर्धा सामने आयोजक / सहभागी संघ / त्यांचे स्पर्धा व्यवस्थापन यांनी १००रु चे स्टॅप पेपर वर स्वाक्षरी करून अपलोड करणे .

कोणतेही कारण न देता मैदान नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त सो.म.पा. यांना राहिल.

क्रीडाधिकारी

सोलापूर महानगरपालिका , सोलापूर